04 FEB 2026 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वि. स. खांडेकर ध्येयवादी लेखक - विनोद शिरसाठ

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** वि. स. खांडेकर यांच्या साहित्याने एका पिढीला ध्येय दिले. त्यांचे साहित्य वाचून कोणी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. कोणी शिक्षकीपेशा स्वीकारला. सहकार, शेतीकडे, व्यापाराकडे वळले. हाच त्यांचा वैश्विक दृष्टिकोण असलेला ध्येयवाद होय, असे प्रतिपादन अभ्यासक विनोद शिरसाठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग, डॉ. अनंत व श्रीमती लता लाभसेटवार प्रन्यास आयोजित भाषा संवर्धन पंधरवड्यात 'खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झाला आहे काय?' या विषयावर ते बोलत होते. माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर अध्यक्षस्थानी होते.

शिरसाठ म्हणाले, खांडेकरांनी पूर्वजन्मीच्या कृत्यांचा व मृत्यूनंतरच्या प्रवासाचा कधीच विचार मांडला नाही, तर ध्येयाची तुतारी फुंकण्यास समाजाला प्रवृत्त केले. त्यांचा ध्येयवाद पराभूत झालेला नाही. उत्तरोत्तर त्याची औचित्यता अधिक वाढत राहिली आहे.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, आदर्श ध्येयवाद कसा असावा, याचे उत्तम उदाहरण म्हणून खांडेकरांच्या साहित्याकडे पाहावे लागते. त्यांचे साहित्य वर्तमानाची जाणीव करून देते.

अमेरिकास्थित डॉ. अनंत लाभसेटवार यांनी मनोगत, डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन, डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
04 FEB 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवी जीवनात तंत्रज्ञानापेक्षा संवेदना महत्त्वाच्या : राजमाने

कोल्हापूर, ता. ३ : 'आजच्या युगात तंत्रज्ञानाचा उपयोग अनिवार्य असला, तरी त्याचा वापर मर्यादित केला पाहिजे. गरजेपेक्षा अधिक तंत्रज्ञानाचा उपयोग माणसाला भावनाशून्य बनवितो. मानवी जीवनात भावना, संवेदनांना महत्त्व आहे. सुखी आनंदी जीवन जगण्यासाठी निःस्वार्थीपणे काम केले पाहिजे,' असे मत मुंबईतील 'फोर्स वन'चे पोलिस अधीक्षक तथा प्रशिक्षक गजानन राजमाने यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागात 'पीएम उषा' सॉफ्ट कॉम्पॉनंट योजनेंतर्गत मंगळवारी 'भाषा प्रयोग एवं अध्यापन में आयसीटी' विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या डॉ. रूपाली संकपाळ यांनी शिक्षणामध्ये शिक्षकांच्या कौशल्यवाढीसाठी तंत्रज्ञानाचा वापर, डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक अभ्यास आणि लेखकीय अधिकार' यावर मार्गदर्शन केले. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी एआय आणि तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता, त्याचा उपयोग सहायक म्हणून केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. संशोधकांनी शोधनिबंधांचे वाचन केले. आसामच्या प्रागज्योतिष महाविद्यालयाच्या डॉ. नंदिता राजबंशी अध्यक्षस्थानी होत्या. शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. साताप्पा सावंत यांच्या उपस्थितीत समारोप झाला.

विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव अध्यक्षस्थानी होते. डॉ. सुषमा चौगले, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. अक्षय भोसले व डॉ. जयसिंग कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. गीता दोडमणी यांनी सूत्रसंचालन केले. प्रतीक्षा ठुंबरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर, डॉ. अनिल मकर, डॉ. प्रकाश निकम यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

04 FEB 2026
लोकमत

# 'आयसीटी'वर चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात 'पीएम उषा' सॉफ्ट कॉम्पॉनंट योजनेअंतर्गत मंगळवारी 'भाषा प्रयोग एवं अध्यापन में आयसीटी' विषयावरील चर्चासत्रात मुंबई येथील 'फोर्स वन'चे पोलिस अधीक्षक तथा प्रशिक्षक गजानन राजमाने यांनी मार्गदर्शन केले. डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यात डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. नंदिता राजबंशी, डॉ. साताप्पा सावंत, डॉ. राजाराम गुरव, डॉ. सुषमा चौगले, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. अक्षय भोसले व डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. गीता दोडमणी, प्रतीक्षा ढुंबरे सहभागी झाले होते.

04 FEB 2026
पुण्यनगरी

# विवेकानंद महाविद्यालय प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या वार्षिक नियतकालिक स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये विवेकानंद कॉलेजच्या विवेक वार्षिक नियतकालिकाने बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात मोठी भर पडली असून, महाविद्यालयाने यशस्वी निकालाची परंपरा कायम राखली आहे. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध साहित्य प्रकारात १५ पारितोषिके पटकावली. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी संपादक मंडळ व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

...विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2026
लोकमत



कोल्हापुरात कमला कॉलेज येथील योग कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते झाडाला पाणी घालून करण्यात आले. यावेळी डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्रा. अश्विनी कुंभार, डॉ. शीतल पाटील-देसाई, अनुराधा ढवळे उपस्थित होत्या.

# कमला कॉलेजच्या लीड कॉलेज योग कार्यशाळेला प्रतिसाद

## सकारात्मक विचार करा, नशीब बदलेल : मानकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय न्यू कॉलेज क्लस्टर परिक्षेत्र अंतर्गत योगा व शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागातर्फे घेण्यात आलेल्या "आधुनिक मानसशास्त्रीय दृष्टिकोनासह योगसाधना" या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेला चांगला प्रतिसाद मिळाला.

तणावमुक्तीच्या आधुनिक आणि संशोधनाधारित पद्धतीची ओळख करून देणे हा या कार्यशाळेचा हेतू होता. प्रमुख पाहुणे न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते झाडाला पाणी घालून कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. यावेळी प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, लीड कॉलेजच्या समन्वयक प्रा. अश्विनी कुंभार उपस्थित होते. डॉ. मिलिंद मानकर, डॉ. शीतल पाटील-देसाई आणि अनुराधा ढवळे तज्ज्ञ वक्ते म्हणून सहभागी झाले. डॉ. मानकर यांनी सकारात्मक विचारसरणीमुळे जीवनात सकारात्मक बदल घडतो, असे सांगितले.

प्रा. डॉ. नीता धुमाळ, प्रा. रामेश्वरी गुंजीकर आणि प्रा. सविता माजगावकर यांनी कार्यशाळेचे संयोजन केले. ले. ज्योती लेंगरे यांनी प्रास्तविक केले. श्रिया आवटे आणि प्रा. प्रीती जावळे यांनी सूत्रसंचालन केले. स्मिता गडकरी यांनी आभार मानले. यावेळी मानसी लंबे, प्रा. अर्चना लाड, प्रा. तेजस्विनी किल्लेदार, प्रा. लता देशमुख, प्रा. पूनम यादव उपस्थित होते. (वा. प्र.)

0 4 FEB 2026

पुढारी

# विद्यापीठाकडून ६६५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ६६५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत सध्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बीएस्सी, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध पाच केंद्रांवर झाल्या. परीक्षेला ४७ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ३ रोजी थ्री इयर लॉ, एमए (राज्यशास्त्र) या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

04 FEB 2026
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## ज्ञान-विज्ञान

डॉ. व्ही.एन. शिंदे

# अनुभवातून ज्ञानार्जन!

**जंगली प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये जीव गमावण्याची भिती नसल्याने मानव शेती, शेतातील पिके, त्यामध्ये सुधारणा कशी आणि काय करायची याचाच तो विचार करू लागला. एकाच जागेवर कायम शेती केली तर हवी तशी पिकत नाही हे लक्षात आल्यानंतर त्याने जागा बदलून पिके घेणे गरजेचे असल्याचेही अनुभवातून शिकून घेतले.**

हिमयुगाच्या अस्तानंतर पाषाण युगाची सुरुवात झाली. हिमयुगांच्या काळात माणसापुढे, मानवाच्या पूर्वजापुढे अनेक संकटे 'आ' वासून उभा होती. जंगली प्राणी कधी हल्ला करतील आणि जीव घेतील याची चिंता होती. दुसरे म्हणजे बर्फ इतक्या मोठ्या प्रमाणात पडत होता की थंडीपासून स्वतःचा जीव वाचवणे कठीण झाले होते. तत्कालीन मानवाच्या अंगावरही, शेळ्या-मेंढ्यांच्या अंगावर असतात तसे केस होते. ते थंडीपासून वाचण्यासाठी पुरेसे नव्हते. जंगली प्राण्यांना भिती घालण्यासाठी अग्नीचा वापर करायला आदिमानव शिकला होता. आणखी एक महत्त्वाचे आव्हान होते ते भूक मिटवण्याचे. त्यासाठी तो रोज सकाळी उठून, टोळीने बाहेर पडून शिकार करत असे. शिकारीसाठी हाताचा वापर जास्त होत असे.

अन्य प्राणी चालण्यासाठी चार पायांचा वापर करतात. मानवाला पुढचे पाय, पाय न राहता हात बनले. वाघ, सिंह, लांडगा यांच्याही पुढच्या पायाचे पंजे सावजाला पकडण्यासाठी विकसित झाले आहेत. मानवाच्याही पुढच्या पायाची म्हणजेच हाताची रचना त्याच प्रकारची होती. पुढे मानवाने दोन पायावर चालणे सुरू केले. पुढच्या पायाचा वापर इतर कामासाठी करू लागल्याने, हाताची रचना बदलली.

समजा आजही मानव चार पायावरच चालत असता, तर आपल्या हाताची रचना वाघ, सिंहांच्या पायासारखी राहिली असती. मात्र, दोन पायावर चालू लागल्यानंतर हाताचा वापर अन्य प्राण्यांच्या तुलनेत जास्त प्रभावीपणे वापरता येणे शक्य झाले. तसेच त्याने प्राण्यांकडून आणि निसर्गात घडणाऱ्या घटनांतून शिकायला सुरुवात केली होती. पुढे तो सुरक्षेसोबत सुख शोधू लागला. कमी कष्ट म्हणजे सुख ही कल्पना सुरुवातीपासून होती. त्यासाठी तो अन्य प्राण्याचे अनुकरण करत होता. प्राणी शिकार केल्यानंतर शिल्लक राहिलेले मांस, बर्फाखाली झाकून ठेवत. थंडपणामुळे मांस सडत नसे. हे पाहून मानवही तसे अन्न बर्फाखाली ठेवून पुरवून वापरत असे. मानवासाठी नैसर्गिकरित्या तयार झालेल्या गुहा याच सुरक्षित होत्या. मात्र, हिमयुग संपत आल्याबरोबर त्याला रोजची शिकार रोज करणे गरजेचे बनले. दोन दिवस शिकार नाही मिळाली तर उपाशी रहावे लागत असे. यातून तो फळे, पाने, फुले, धान्याच्या बिया खाऊ लागला. मांसापेक्षा वनस्पतीजन्य पदार्थांचे आहारातील प्रमाण वाढले. त्यातही अनेकदा शिकार मिळत नसल्याने केवळ फळे, कंदमुळे, पाने खाण्यावर भर दिला जाऊ लागला होता. मात्र, शिकारीला जाताना टोळीतील लोक गुहेमध्ये गरोदर महिला, वृद्ध आणि मुलांना ठेवून जात.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

त्यातून एक महत्त्वाचा शोध लागला. इराक, तुर्कस्तान भागात अशीच एक टोळी रहात होती. त्या टोळीतील पुरुषही असेच अन्नाच्या शोधात बाहेर जात. घरातील महिला घरात असणारे धान्य निवडण्याचे काम करत. खराब धान्य, कचरा बाहेर टाकत. त्यातील काही बिया उगवल्याचे महिलांच्या लक्षात आले. त्या रोपांना त्यांनी उपटले नाही. तसेच मोठे होऊ दिले. काही दिवसांनी रोपाला नवे कणीस आले. त्यात हळूहळू बिया भरल्या. पुढे त्याच महिलांनी आजूबाजूच्या परिसरातील गवत काढून, जाणीवपूर्वक बिया मातीमध्ये लपवल्या. पाऊस पडताच त्यातून नवी रोपे आली आणि त्यापासून त्यांना धान्यही मिळाले. तोपर्यंत मानवाची भटकंती सुरू होती. शिकार मिळेपर्यंत तो एका जागेवर थांबत असे. महिलांचा प्रयोग पाहून धान्य असेही मिळू शकते, याचे ज्ञान मानवाला मिळाले. मग त्याने जणू जमिनीशी करार करायचे ठरवले. एका जागी स्थिर राहून, जमिनीची भरपूर सेवा करायची आणि जमिनीने त्याला हवे तेवढे धान्य द्यायचे. यातून त्याची भटकंती थांबणार होती.

यात मानवाचे हितच होते. तो सुरक्षित आसरा बनवू शकत होता. अग्नी तेवत ठेवून जंगली प्राण्यापासून संरक्षण मिळवणे शक्य होते. त्याचबरोबर शेती करून सुखाने राहता येणार होते. त्याने यासाठी नदीचा किनारा निवडला. त्याची काही प्रमुख कारणे होती. त्यातील सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे, नदीकाठी शेती करण्यायोग्य जमीन उपलब्ध होती. दुसरे म्हणजे, त्याला मुबलक पाणी मिळत होते. तिसरे कारण म्हणजे, नदीवर पाणी पिण्यासाठी अनेक प्राणी येत आणि मानवाला भटकंती न करताही शिकार मिळत होती. मानवाने कमी कष्टामध्ये आपली सुरक्षितता आणि अन्नाची हमी मिळवली. त्या वेळेपासून माणसाने कायम सुरक्षितता आणि सुखाचाच विचार कायम केला आहे. त्यातूनच आजची भीषण परिस्थिती उद्भवली आहे. मात्र, ही मानवाची सुरुवात होती. मानवाने सुरुवातीला सुरक्षित जागा निवडून झाडांच्या फांद्या, गवत आणि दगडांपासून घरे बनवली. बाजूच्या भागातील गवत काढून जमीन भुसभुशीत करून बिया पेरल्या. मात्र त्या रोपांना जंगलातील हरीण, काळवीट आणि सशांनी खाल्ले. पुन्हा त्या रोपांना खाऊ नये म्हणून तो बिया पेरलेल्या जमिनीभोवती झाडांच्या फांद्याचे कुंपण घालायला शिकला. अनुभवातून माणूस शिकत गेला. जे अनुभवातून ज्ञान मिळाले ते त्याने पुढच्या पिढीपर्यंत मौखिक पद्धतीने पोहोचवायला सुरुवात केली. शेतीतील ज्ञान वाढत गेले. त्यातील महत्त्वाच्या अनेक पद्धती विकसित झाल्या. त्यातील महत्त्वाची पद्धती होती, ती म्हणजे जैविक खते, सेंद्रिय खते मातीत मिसळण्याची पद्धत होय. माणूस स्थिर झाला. त्याचे शारीरिक कष्ट कमी झाले, तसे विचार करण्यास त्याला वेळ मिळू लागला, कारण सुरक्षेची चिंता कमी झाली होती.

आता जंगली प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये जीव गमावण्याची भिती नसल्याने शेती, शेतातील पिके, त्यामध्ये सुधारणा कशी आणि काय करायची याचाच तो विचार करू लागला. एकाच जागेवर कायम शेती केली तर हवी तशी पिकत नाही हे लक्षात आल्यानंतर त्याने जागा बदलून पिके घेणे गरजेचे असल्याचेही अनुभवातून शिकून घेतले. विशेष हे की, जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या आदिमानवांनी मानव बनण्यास, स्थिर होण्यास एकाच कालखंडात सुरुवात केली. साधारण हजारेक वर्षांचा तो कालखंड होता, इसवी सन पूर्व नऊ ते दहा हजार वर्षांपूर्वीचा. अनुभवातून ज्ञान मिळवण्याची आणि त्याची पुनर्पडताळणी करून त्याचे विज्ञानात रूपांतर करण्याचे कौशल्य मानवाचे विकसित होण्यास यावेळेपासून सुरुवात झाली.

अनुभवातून ज्ञान मिळवणे, त्याची पुनर्पडताळणी करून खात्री करून घेणे आणि पुनर्पडताळणी होत असल्यास त्याला विज्ञानात रूपांतर करण्यास शेतीपासून सुरुवात झाली; त्यातून पुढे चाकाचा उपयोग तो करू लागला आणि विज्ञानानेही गती पकडली.

संपर्क : ९६७३७८४४००

0 4 FEB 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात बजेटवर परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात केंद्रीय अर्थसंकल्पावर आयोजित विशेष परिसंवादात विविध बाबींच्या अनुषंगाने चर्चा आणि प्रश्नोत्तरेही झाली. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित या परिसंवादात तज्ज्ञांनी सहभाग घेतला.

परिसंवादात डॉ. आण्णासाहेब पाटील यांनी अर्थसंकल्पातील विविध तरतुदींबद्दल विस्तृत विवेचन करताना शिक्षण, कौशल्य विकास व तंत्रज्ञान या बाबींच्या विकासासाठी तरतूद मुबलक असली तरी आणखी लक्ष देण्याची आवश्यकता व्यक्त केली. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे यांनी अर्थसंकल्पातील सामाजिक बाबींवर भाष्य केले. डॉ. केदार मारूलकर यांनी अर्थसंकल्पातील कर प्रस्ताव या विषयावर मांडणी केली. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी अध्यक्षस्थानावरून अर्थसंकल्पाकडून असलेल्या अपेक्षा आणि प्रत्यक्ष तरतुदी यांचा आढावा घेतला. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी प्रास्ताविक केले, तर हरीष कांबळे यांनी आभार मानले.

04 FEB 2026

जनप्रवास

# मानवी जीवनात तंत्रज्ञानापेक्षा संवेदना महत्त्वाच्या : राजमाने

**जनप्रवास : कोल्हापूर**

आजच्या युगात तंत्रज्ञानाचा उपयोग अनिवार्य असला तरी त्याचा मर्यादित वापर केला पाहिजे. गरजेपेक्षा अधिक तंत्रज्ञानाचा उपयोग माणसाला भावनाशून्य बनवितो. मानवी जीवनामध्ये भावना आणि संवेदनांना खूप महत्त्व आहे. सुखी आनंदी जीवन जगण्यासाठी निःस्वार्थीपणे काम केले पाहिजे, असे मत मुंबई येथील 'फोर्स वन'चे पोलीस अधीक्षक तथा प्रशिक्षक गजानन राजमाने यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागात 'पीएम उषा' सॉफ्ट कॉम्पॉनंट योजनेअंतर्गत मंगळवारी 'भाषा प्रयोग एवं अध्यापन में आयसीटी' विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी विविध सत्रांमध्ये विषयतज्ज्ञांनी विस्तृत मार्गदर्शन केले. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या डॉ. रूपाली संकपाळ यांनी, शिक्षणामध्ये शिक्षकांच्या कौशल्यवाढीसाठी तंत्रज्ञानाचा वापर, डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक अभ्यास आणि लेखकीय अधिकार' या विषयांवर मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय चर्चामध्ये संशोधकांनी शोधनिबंधांचे वाचन केले.आसाम येथील प्रागज्योतिष महाविद्यालयाच्या डॉ. नंदिता राजबंशी अध्यक्षस्थानी होत्या. शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. साताप्पा सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचा समारोप झाला. विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव अध्यक्षस्थानी होते. डॉ. सुषमा चौगले, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. अक्षय भोसले व डॉ. जयसिंग कांबळे यांनी परिचय करून दिला. डॉ. गीता दोडमणी यांनी सूत्रसंचालन केले. प्रतीक्षा ठुंबरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. संतोष कोळेकर,डॉ. अनिल मकर, डॉ. प्रकाश निकम संख्येने उपस्थित होते.

04 FEB 2026
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात अर्थसंकल्पावर विशेष परिसंवाद



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नुकत्याच सादर झालेल्या सन २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर शिवाजी विद्यापीठात विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित या परिसंवादात अर्थसंकल्पाच्या विविध बाबींच्या अनुषंगाने चर्चा आणि प्रश्नोत्तरेही झाली. परिसंवादात डॉ. आण्णासाहेब पाटील यांनी अर्थसंकल्पातील विविध तरतुदींबद्दल विस्तृत विवेचन केले. अर्थसंकल्पात ग्रामीण भारत, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्र यांच्यासाठी भरीव तरतूद केली आहे. शिक्षण, कौशल्य विकास व तंत्रज्ञान या बाबींच्या विकासासाठी तरतूद मुबलक असली तरी आणखी लक्ष देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे यांनी अर्थसंकल्पातील सामाजिक बाबींवर भाष्य केले. आर्थिक सर्वेक्षण, संवैधानिक तरतुदी आणि भारताची जागतिक अर्थव्यवस्थेमधील स्थिती या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पातील तरतुदींचा त्यांना आढावा घेतला.

डॉ. केदार मारुलकर यांनी अर्थसंकल्पातील कर प्रस्ताव या विषयावर मांडणी केली. अर्थसंकल्पामधील प्राप्तीकरविषयक तरतुदी, तसेच अर्थसंकल्पाचा शेअर बजारावर होणारा परिणाम याबद्दल विवेचन केले. अध्यक्षस्थानावरून डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी अर्थसंकल्पाकडून असलेल्या अपेक्षा आणि प्रत्यक्ष तरतुदी यांचा आढावा घेतला. आर्थिक शिस्त आणि विविध क्षेत्रांसाठी भरीव तरतुदी यामुळे 'विकसित भारत २०४७' कडे वाटचाल करणारा हा अर्थसंकल्प असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी स्वागत केले. हरीष कांबळे यांनी आभार मानले. परिसंवादासाठी एम. कॉम व एम.बी.ए.चे शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
04 FEB 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केंद्रीय अर्थसंकल्प सामाजिक कल्याण, न्याय प्रस्थापित करण्यासाठी मदत करणारा

## डॉ. प्रकाश कांबळे; शिवाजी विद्यापीठात अर्थसंकल्पावर विशेष परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय अर्थसंकल्प हा सामाजिक, आर्थिक विकासाचे प्रभावी साधन असते. यावेळेसचा अर्थसंकल्प हा सामाजिक कल्याणास महत्त्व देणारा व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणारा आहे, असे मत शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागातील ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे यांनी व्यक्त केले.

नुकत्याच सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर शिवाजी विद्यापीठात विशेष परिसंवाद झाला. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित परिसंवादात अर्थसंकल्पाच्या विविध बाबींच्या अनुषंगाने चर्चा व प्रश्नोत्तरे झाली. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. कांबळे यांनी अर्थसंकल्पातील सामाजिक बाबींवर भाष्य केले. आर्थिक सर्वेक्षण, संवैधानिक तरतुदी व भारताची जागतिक अर्थव्यवस्थेमधील स्थिती या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पातील तरतुदींचा त्यांनी आढावा घेतला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित केंद्रीय अर्थसंकल्पावर विशेष परिसंवादात बोलताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे. व्यासपीठावर डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. केदार मारुलकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

डॉ. अण्णासाहेब पाटील यांनी अर्थसंकल्पातील विविध तरतुदींबद्दल विवेचन केले. अर्थसंकल्पात ग्रामीण भारत, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्र यांच्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण, कौशल्य विकास व तंत्रज्ञान या बाबींच्या विकासासाठी तरतूद मुबलक असली, तरी आणखी लक्ष देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. डॉ. केदार मारुलकर यांनी अर्थसंकल्पातील कर प्रस्ताव या विषयावर मांडणी केली. अध्यक्षस्थानावरून डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी अर्थसंकल्पाकडून असलेल्या अपेक्षा व प्रत्यक्ष तरतुदी यांचा आढावा घेतला. आर्थिक शिस्त आणि विविध क्षेत्रांसाठी भरीव तरतुदी यामुळे 'विकसित भारत २०४७'कडे वाटचाल करणारा हा अर्थसंकल्प असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी प्रास्ताविक केले. हरीष कांबळे यांनी आभार मानले.

04 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनप्रवास

# विद्यापीठस्तरीय रँकिंगमध्ये रसायनशास्त्र, अर्थशास्त्र अधिविभाग सर्वोत्कृष्ट

## रसायनशास्त्र विभागाला ४० समाजोपयोगी पेटंट्स प्राप्त : संशोधन कार्याला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख : कामगिरीत सातत्य राखावे : डॉ. गोसावी

**जनप्रवास : कोल्हापूर**

अधिविभागांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कामगिरीवरच समग्र विद्यापीठाच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जात असते. शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांनी 'विद्यापीठ अधिविभागीय रँकिंग फ्रेमवर्क'मध्ये चांगले प्रदर्शन केले असून यापुढील काळात ही कामगिरी सातत्याने उंचावत राहण्यासाठी विभागांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.

महाराष्ट्र शासनाने, राज्यातील अकृषि सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठांतील विविध अधिविभागांकडून संशोधनाला चालना देणे, कार्यपद्धतीत पारदर्शकता आणणे आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे यासाठी विद्यापीठांतर्गत विभागांना मानांकन देण्याचा उपक्रम दरवर्षी राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीमार्फत सर्व अधिविभाग, अध्यासने आणि केंद्र यांची १० व ११ डिसेंबर रोजी प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली होती. शनिवारी त्या तपासणीचा निकाल जाहीर केला.

या अधिविभागनिहाय क्रमवारी मानांकनामध्ये रसायनशास्त्र अधिविभाग आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. या उपक्रमांतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा आणि मानवविज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांच्याअंतर्गत प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या अधिविभागांना अनुक्रमे रुपये दहा लाख व पाच लाख आणि अध्यासने आणि केंद्रांच्या गटामध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्यांना अनुक्रमे रुपये दोन लाख व एक लाख तसेच प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह अशा पारितोषिकांनी गौरविण्यात आले. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत रसायनशास्त्र अधिविभागाने प्रथम, तर नॅनो विज्ञान आणि बायोटेक्नोलॉजी अधिविभागाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. इतर विद्याशाखांच्या गटात अर्थशास्त्र अधिविभागाने प्रथम आणि शिक्षणशास्त्र अधिविभागाने द्वितीय क्रमांक मिळविला. अध्यासने व केंद्र या गटामध्ये विद्यापीठ वैज्ञानिक उपकरण केंद्राने प्रथम आणि शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या सर्व मानांकनप्राप्त अधिविभाग व केंद्रांना डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते आणि डॉ. ज्योती जाधव, डॉ. विलास शिंदे आणि डॉ. सागर डेळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिके दिली.



**कोल्हापूर : सर्वोत्कृष्ट अधिविभागासाठीचे पारितोषिक डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते स्वीकारताना रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. संजय चव्हाण. सोबत अधिविभागातील शिक्षक.**

### समाजोपयोगी संशोधनावर रसायनशास्त्र अधिविभागाचा भर

रसायनशास्त्र अधिविभागाने संशोधनाच्या माध्यमातून समाजोपयोगी व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यावर विभागाने सातत्याने भर दिला आहे. गेल्या पाच वर्षांत रसायनशास्त्र विभागाला संशोधनासाठी एक कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी प्राप्त झाला. या निधीच्या माध्यमातून स्मार्ट व प्रकाशोत्सर्जक पदार्थ, कॅन्सरवरील संशोधन, ऊर्जा साठवणुकीसाठी सुपर कॅपेसिटर बॅटरी, विविध प्रकारचे सेन्सर तसेच औद्योगिक वापरासाठी उपयुक्त रसायनांच्या निर्मितीवर महत्त्वपूर्ण संशोधन करण्यात आले. विभागाने एकूण ४० समाजोपयोगी पेटंट्स प्राप्त केली असून त्यामध्ये भारतीय, जर्मन तसेच युनायटेड किंगडम (यूके) येथील पेटंट्सचा समावेश आहे. या पेटंट्समुळे विभागाच्या संशोधन कार्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे. युडीआरएफमधील मानांकनामुळे अधिविभागाच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाल्याचा आनंद वाटतो, अशी प्रतिक्रिया अधिविभाग प्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी व्यक्त केली.

04 FEB 2026

जनप्रवास



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी केंद्रीय अर्थसंकल्पावर आयोजित विशेष परिसंवादात विचार मांडताना डॉ. आण्णासाहेब पाटील. सोबत अन्य मान्यवर.

# 'विकसित भारत @ २०४७'कडे वाटचाल करणारा अर्थसंकल्प

- डॉ. श्रीकृष्ण महाजन : आर्थिक शिस्त आणि विविध क्षेत्रांसाठी भरीव तरतूद
- शिवाजी विद्यापीठात अर्थसंकल्पावर विशेष परिसंवाद

**जनप्रवास : कोल्हापूर**

अर्थसंकल्पाकडून असलेल्या अपेक्षा आणि प्रत्यक्ष तरतुदी यांचा आढावा मांडत, आर्थिक शिस्त आणि विविध क्षेत्रांसाठी भरीव तरतुदी यामुळे 'विकसित भारत @ २०४७'कडे वाटचाल करणारा हा अर्थसंकल्प असल्याचे मत डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठात केंद्रीय अर्थसंकल्पावर आयोजित परिसंवादात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

२०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर शिवाजी विद्यापीठात मंगळवारी विशेष परिसंवाद आयोजित केला होता.

डॉ. आण्णासाहेब पाटील यांनी अर्थसंकल्पातील विविध तरतुदींबद्दल विस्तृत विवेचन केले. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे यांनी अर्थसंकल्पातील सामाजिक बाबींवर भाष्य केले. अर्थसंकल्पातील तरतुदींचा त्यांना आढावा घेतला.

डॉ. केदार मारुलकर यांनी अर्थसंकल्पातील कर प्रस्ताव या विषयावर मांडणी केली. शेअर बजारावर होणारा परिणाम याबद्दल विवेचन केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी स्वागत केले, तर हरीष कांबळे यांनी आभार मानले.

## शिक्षण, कौशल्य विकास, तंत्रज्ञानाकडे आणखी लक्ष द्यावे

अर्थसंकल्पात ग्रामीण भारत, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्र यांच्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण, कौशल्य विकास व तंत्रज्ञान या बाबींच्या विकासासाठी तरतूद मुबलक असली तरी आणखी लक्ष देण्याची आवश्यकता डॉ. आण्णासाहेब पाटील यांनी व्यक्त केली.

04 FEB 2026
सकाळ

# विद्यापीठातील परिसंवादात अर्थसंकल्पावर चर्चा

कोल्हापूर, ता. ३ : केंद्रीय अर्थसंकल्पावर शिवाजी विद्यापीठात सोमवारी विशेष परिसंवाद झाला. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाने घेतलेल्या या परिसंवादात अर्थसंकल्पाच्या विविध बाबींच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

या परिसंवादात डॉ. आण्णासाहेब पाटील यांनी अर्थसंकल्पातील विविध तरतुदींबद्दल विस्तृत विवेचन केले. अर्थसंकल्पात ग्रामीण भारत, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्र यांच्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली. शिक्षण, कौशल्य विकास व तंत्रज्ञान या बाबींच्या विकासासाठी तरतूद मुबलक असली, तरी आणखी लक्ष देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. डॉ. प्रकाश कांबळे यांनी अर्थसंकल्पातील सामाजिक बाबींवर भाष्य केले. आर्थिक सर्वेक्षण, संवैधानिक तरतुदी आणि भारताची जागतिक अर्थव्यवस्थेमधील स्थिती या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पातील तरतुदींचा त्यांनी आढावा घेतला.

डॉ. केदार मारुलकर यांनी 'अर्थसंकल्पातील करप्रस्ताव' या विषयावर मांडणी केली. अर्थसंकल्पामधील प्राप्तिकरविषयक तरतुदी, तसेच अर्थसंकल्पाचा शेअर बजारावर होणारा परिणाम याबद्दल विवेचन केले.

अध्यक्षस्थानावरून डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी अर्थसंकल्पाकडून असलेल्या अपेक्षा आणि प्रत्यक्ष तरतुदी यांचा आढावा घेतला. आर्थिक शिस्त आणि विविध क्षेत्रांसाठी भरीव तरतुदी यामुळे 'विकसित भारत २०४७' कडे वाटचाल करणारा हा अर्थसंकल्प असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी स्वागत केले. यावेळी एम. कॉम., एम. बी. ए. चे शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. हरिष कांबळे यांनी आभार मानले.